| MHLA130000532024 | **नि.दि.दावा क्र.१२/२०२४**<br>**ज्ञानेश्वर विरुध्द रमेश व इतर** |
|---|---|

**<u>निशाणी क्र. १७ खालील आदेशः–</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादीने आदेश ६ नियम १७ व आदेश १ नियम १० दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले.

२. वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे कथन केले की, प्रस्तुत दावा वादी यांनी वाटणी होऊन स्वतंत्र ताबा मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादीचे कथनाप्रमाणे दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ व ८ यांनी दि.१४.०५.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.७ यांच्या नावे खरेदीखत क्र.९६०/२०२४ वादीच्या अपरोक्ष विक्री केली आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जातील परिच्छेद क्र.३/अ ते ३/ड प्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी वादीने मागितलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास अक्षेप नोंदविला आहे. वादींनी सदरचा अर्ज हा खोडसाळपणाने दिलेला आहे. प्रतिवादीनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुत दावा वाटणी होऊन स्वतंत्र ताबा मिळणेकरीता दाखल केला आहे. वादीने प्रत्तुत अर्जातील मिळकती आणि इतर बाबी नमुद केलेल्या आहेत त्या मिळकतीबाबत प्रतिवादी यांनी त्याचे म्हणणे सादर करुन विरोध केला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये वाटणीचा वाद असल्यामुळे दाव्यातील प्रत्येक पक्षकाराचा पुर्व हक्क व अधिकार असतात. त्यामुळे दावा मिळकतीतील पक्षकारांचे हक्क व अधिकार ठरवण्याकरीता सदर दुरुस्ती दाव्यात करणे आवश्यक वाटते. वादीने या अर्जात नमुद केलेली

प्रस्तावीत दुरुस्ती ही प्रकरणाच्या निवाडयाच्या दृष्टीने महत्वाची आहे. तसेच, प्रस्तुत दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेकरीता दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तुतची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे असे दिसून येते. प्रस्तावीत दुरुस्तीस परवानगी दिल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही अथवा कोणतेही नुकसान होणार नाही. वरील सर्व विविंचणेचा विचार करता वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देणे न्यायोचित ठरेल. सबब खालीलप्रमाणे आदेश.

**आदेश**

१. वादी यांचा अर्ज नि.क्रं १७ मंजुर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तावीत दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करुन दुरुस्ती वादपत्र प्रकरणात दाखल करावे.

स्वाक्षरीत/-

**रेणापूर** **(के.के.वाघमारे)**

**दिनांकः- १४/०२/२०२५** **सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर., रेणापूर**